नाशिक महानगरपालिका,नाशिक

सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,पा.पु,

अल्प मुदत ई-कोटेशन नोटीस क्रं. ०१ - २०२३-२४

कामाचे नांव :- नाशिकरोड पाणी पुरवठा विभागातील प्र.क्र.१८ व १९ येथे विविध ठिकाणी पाणी पुरवठा करण्यासाठी खाजगी टँकर पुरविणे.

१.	कामाची मुदत	: ३० दिवस
२.	कोटेशन फॉर्म मिळण्याचे ठिकाण	: कार्यकारी अभियंता (वितरण) सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,पाणी पुरवठा राजीव गांधी भवन, नाशिक.
३.	काम करण्याचे ठिकाणी	: कार्यकारी अभियंता (वितरण) सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,पाणी पुरवठा राजीव गांधी भवन, नाशिक.
४.	कोटेशन फॉर्म मिळण्याची दिनांक	: दि. १६/०९/२०२३ ते दि. २०/०९/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत
५.	कोटेशन जमा करण्याची अंतिम दिनांक	: दि. २०/०९/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत.
६.	कोटेशन जमा करण्याचे ठिकाणे	: कार्यकारी अभियंता (वितरण) सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,पाणी पुरवठा राजीव गांधी भवन, नाशिक.

Xxx/-

कार्यकारी अभियंता,

सार्व.आरोग्य अभियांत्रिकी विभाग,पा.पु,

नाशिक महानगरपालिका,नाशिक

नाशिक महानगरपालिका,नाशिक
सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,पा.पु,
अल्प मुदत ई-कोटेशन नोटीस क्रं.०१-२०२३-२४

कोटेशन फॉर्म

कामाचे नांव :- नाशिकरोड पाणी पुरवठा विभागातील प्र.क्र.१८ व १९ येथे विविध ठिकाणी पाणी पुरवठा करण्यासाठी खाजगी टँकर पुरविणे.

दिनांक :- १५/०९/२०२३

NASHIK MUNICIPAL CORPORATION
WATER SUPPLY DEPARTMENT
THE SPECIAL CONDITIONS OF CONTRACT

१. कोटेशन धारक महाराष्ट्र सार्व बांधकाम विभाग/ महाराष्ट्र जिवन प्राधिकरण/ सीपीडब्ल्युडी /एमईएस यांचेकडील नोंदणीकृत मक्तेदार असावा. स्वतच्या मालकीचे वाहन टॅकर असलेबाबत नंबरसह यादी व आर.टी.ओ कडील कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रती तसेच निविदा सादर करण्या-याकडे इतरांची वाहने (टँकर्स) असतील तर व्यक्ती / संस्था यांचेकडुन घेता येतील. उपरोक्त संबंधीत कागदपत्र कोटेशन बरोबर अपलोड करणे तसेच कोटेशन उघडतांना त्याच्या मुळ प्रति दाखविणे बंधनकारक राहील.

२. संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता / उप अभियंता यांनी आदेशित केलेल्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा वितरण करणे बंधनकारक राहील.

३. टँकर चालक /क्लिनर, ऑईल तसेच टँकर दुरुस्ती इ.विषयी होणारा संपुर्ण खर्च मक्तेदार यांनी करणे बंधनकारक राहिल.

४. पुरविण्यात आलेला टँकर नादुरुस्त झाल्यास त्याऐवजी नवीन पर्यायी टँकर त्वरीत पुरविणे बंधनकारक राहिल.

५. टँकरने प्रति दिवशी किती खेपा केल्या या बाबत संबधित विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे प्रमाणपत्र लिहुन घेणे बंधनकारक राहिल.

६. टँकर चालक / क्लिनर काही कारणास्तव काम करण्यास असमर्थ असल्यास त्याचे ऐवजी पर्यायी व्यवस्था नविन चालक / क्लिनर त्वरीत उपलबध करणे बंधनकारक राहिल.

७. टँकरसाठी ज्या दिवशी खेपा नसतील त्या दिवशी टँकर खेपा देणे मनपावर बंधनकारक नसेल. दररोज कमीत कमी पाच खेपा कराव्या लागतील व तसे आश्वासित करण्यात येत आहे.

८. टँकरद्वारे ज्या ठिकाणी खेप केली त्या प्रत्येक वेळी जेथे खेप दिल्या त्या तेथील मनपाने नेमलेल्या व्यक्तीच्या टँकर पोचल्याची वेळ, दिनांक व सही घेणे कोटेशन धारकास बंधनकारक राहिल. त्याबाबतचे उप अभियंता यांना सांक्षाकित केलेले रजिस्टर ठेवणे बंधनकारक राहिल.

९. टँकर द्वारे पाणी पुरवठा करत असतांना कांही अपघात / दुर्घटना झाल्यास त्यास कोटेशन धारकास सर्वस्वी जवाबदार राहिल यास मनपा जवाबदार राहणार नाही.

१०. टँकरचे RTO Passing, insurance,इ.बाबी परीपूर्ण असणे आवश्यक आहे.

११. आदेश मिळाल्यापासून संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता / उप अभियंता यांचेकडे पाठविण्यात येतील त्यांच्या आदेशानुसार ते सांगतील त्या ठिकाणी पाणी पुरवठा करावा.

१२. टँकर मालकांस अदा करण्यात येणा-या देयकच्या रक्कमेवर शासन नियमानुसार आयकर कापण्यात येईल.

१३. कोणत्याही वेळी कोटेशन धारकांने कडुन नकार दिल्यास पाणी पुरवठयाचे काम अन्य कोटेशनधारका कडून पूर्ण करुन घेतले जाईल व त्यापोटी होणारा जादा खर्च येईल तो पहिल्या कोटेशनधारका कडून वसुल केला जाईल दंड न दिल्यास सदरची रक्कम सुरक्षा अनामत जप्त करुन त्यातून वसुल केली जाईल.

१४. कामगार नुकसान भरपाई कायदयाप्रमाणे नुकसान भरपाई रक्कम मजूरांना देणे बाबतची जबाबदारी कोटेशनधारकाची राहील. तसेच वाहनांस झालेल्या अपघातातून उदभवणा-या आनुषंगिक सर्व खर्चाची जबाबदारी कोटेशनधारकाची राहिल.

१५. माहे **मार्च १८** अखेर पर्यंतचे सर्व्हिस टॅक्स, सेल्स टॅक्स निपटारा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

१६. टपालद्वारे / कुरीअरद्वारे पाठविण्यात आलेले कोटेशन स्विकारण्यात येणार नाही.

१७. देयकाची रक्कम पुरेशी तरतुदी अभावी या इतर कारणामुळे देण्यास उशीर झाल्यास त्यावर कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१८. दर नमूद करतांना त्यात सर्व करांचा समावेश असावा. वेगळे दर अनुज्ञेय असणार नाही.

१९. कोटेशनधारक यांना टँकरचा सर्व समावेशक विमा(Comprehensive policy) काढणे बंधनकारक राहील व सदर विम्याचे सर्टिफिकेट मा. कार्यकारी अभियंता,यांचेकडेस दाखल करणे बंधनकारक राहिल.

२०. कोटेशनधारक यांना कामगार कायदयान्वये आवश्यक असलेली कामगार विमा पॉलीसी घेणे बंधनकारक राहिल व सदर पॉलीसी सर्टिफिकेट मा. कार्य अभियंता यांचेकडे दाखल करणे बंधनकारक राहिल.

२१. प्रस्तुत कोटेशनधारकासाठी आवश्यक असलेल्या करारनाम्यातील आवश्यक असलेला मुद्रांक खर्च व नोंदणी खर्च कोटेशनधारक यांना करावा लागेल.

२२. प्रस्तुत कामाच्या मक्त्याबाबत मा.आयुक्त,नाशिक व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेले आदेश व निर्देश कोटेशनधारकावर बंधनकारक राहतील.

२३. यशस्वी कोटेशनधारकास त्यानी पुरवठा केलेल्या टँकरला ठरवून देण्यात आलेल्या दैनिक खेपा करणे बंधनकारक राहील. अशा खेपा करण्यास कसूर झाल्यास देयक अदा करण्यात येणार नाही.

२४. टँकरवर काम करणा-या कर्मचा-यांचे अधिकृत वाहन चालक व मदतनिस वेतन व भत्ते तसेच टँकरासाठी लागणारे तेल व इंधन वाहन मालकानेच अदा करावयाचे आहेत. यासाठी वाहनामध्ये इंधन भरणेबाबत कोटेशनधारकाने स्वतंत्र व्यवस्था करावी.

२५. यशस्वी कोटेशनधारकास किंवा त्यांनी पुरवठा केलेल्या टँकरला कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.त्याचप्रमाणे इंधन पुरवठा केला जाणार नाही.

२६. मंजूर झालेल्या कोटेशन धारकास रु.५००/- किंमतीचे मुद्रांक स्टॅम्पपेपरवर आठ दिवसांत विहीत अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करुन दयावा लागेल.

२७. यशस्वी कोटेशन ठरवून दिलेल्या मुदतीत कार्यक्षमतेने व करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याचे कोटेशन रद्द करणेत येईल.

याशिवाय, दुस-या न्युनतम यशस्वी एल-२ कोटेशनधारकाकडून काम करुन घेण्यात आल्यास त्याकरीता होणारा जादा खर्च मुळे यशस्वी कोटेशनधारकाकडून वसूल करणेत येईल.

२८. टँकर वाहन सुस्थितीत असणे आवश्यक आहे. वाहनाची आर.टी.ओ कडून वेळोवेळी तपासणी करुन घेणे बंधनकारक राहील.

२९. शासन नियमाप्रमाणे बिलातून आयकर व त्यावरील सरचार्ज कापून घेणेत येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीही मागणी केल्यास त्याची भरपाई कोटेशनधारकास करावी लागेल.

३०. कोटेशनमध्ये नमुद केलेले दर सर्व समावेशक असावेत, त्याबाबत इतर कोणतीही वेगळी भरपाई दिली जाणार नाही. मंजूर झालेल्या कोटेशन दरामध्ये वाढ केली जाणार नाही.

३१. कोटेशनधारक / सहकारी संस्था यांना काळया यादीत घोषित केलेले असल्यास अशा कोटेशनधारक/ सहकारी संस्था यांनी कोटेशन भरु नयेत. असे आढळून आल्यास कोटेशन विचारात घेतली जाणार नाही.

३२. कोटेशन कालावधीमध्ये लावण्यात येणा-या टँकवर जी.पी.एस यंत्रणा बसविणे अनिवार्य आहे. तसेच सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती टँकवर वाहतुकदारांवर स्वखर्चाने करावयाची आहे.

३३. कोटेशनधारकांनी टँकर सप्लायचे नियोजन करण्यासाठी मिस्तरीची नेमणुक करणे बंधनकारक राहील.

३४. **सुचना- नाशिक महानगरपालिकेत सदरचे काम करु इच्छिणा-या व नोंदणी नसलेल्या मक्तेदारांनी नोंदणी करणेसाठी ई-निविदा विभाग, राजीव गांधी भवन,तिसरा मजला येथे संपर्क साधुन नोंदणी करुन घ्यावी.**

SCHEDULE – B

Name of Work :-. Providing & Supplying Water Tanker in p.no. 18 & 19 Nashik Road Division.

Item No	Item	Qty	Rate	Unit	Amount
1	**Providing & Supplying Tanker in Municipal Corporation limits area including water distribution and material required etc. Water will be providing by nmc at Hydrant place as directed by Engg. In Charges (With motor mounted).**				
	Capacity - 8000 Litre	372.00	650.00	No	241800.00
				Total	241800.00
				GST 18 %	43524.00
					285324.00
				Say Rs	**2,85,324.00**

I /We hereby agreed to execute the above work at % above / below the estimated rate

Executive Engineer
Water Supply Department
Nashik Municipal Corporation, Nashik.